जाहिरात

# जिल्हा निवड समिती, रायगड-अलिबाग

जाहिरात क्रमांक: मशा/आस्था-१/अ-८/प्र.क्र.०५/कंत्राटीपदे/२०१४-१५

दिनांक १२/०२/२०१५

---

जिल्हा निवड समिती, रायगड-अलिबाग मार्फत दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडोअर अंतर्गत अर्ली बोर्ड प्रोजेक्टसाठीचे भूसंपादन करणेकरीता खाली नमूद केलेली पदे कंत्राटी पध्दतीने भरती करणेची आहे. सदर प्रकल्पाकरीता भूसंपादनाची प्रक्रिया ही मुदतीत पूर्ण करण्याची आहे.त्यासाठी इच्छूक उमेदवारां कडून विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक ०४/०३/२०१५ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदांचा तपशील | पद संख्या | वित्तलब्धी (प्रति महिना) |
|---|---|---|---|
| १ | विशेष कार्य अधिकारी (भूसंपादन) | १ | रु. ५००००/- |
| २ | वरिष्ठ सहाय्यक (कार्यालय) | १ | रु. २००००/- |
| ३ | सर्व्हेअर | १ | रु. २५०००/- |
| ४ | सहाय्यक (भूसंपादन) | १ | रु. १५०००/- |
| ५ | मदतनीस | २ | रु. १००००/- |
| ६ | वाहनचालक | १ | रु. १००००/- |
| एकुण | | ७ | --- |

## आवश्यक अर्हता :-

१) **विशेष कार्य अधिकारी (भूसंपादन)** :- सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी किंवा तत्सम पदावरील सेवानिवृत्त अधिकारी.

२) **वरिष्ठ सहाय्यक (कार्यालय)** :- शासकीय सेवेतील सेवानिवृत्त नायब तहसिलदार, अव्वल कारकून/ उप-लेखापाल, सेवानिवृत्त भूमी अभिलेख विभागातील मुख्यालय सहाय्यक, निमतानदार, शिरस्तेदार किंवा इतर विभागातील समकक्ष सेवानिवृत्त कर्मचारी.

३) **सर्व्हेअर** :- शासकीय सेवेतील भूमी अभिलेख विभागातील सेवानिवृत्त मुख्यालय सहाय्यक, निमतानदार, शिरस्तेदार, सर्व्हेअर किंवा स्थापत्य शाखेतील पदवीका किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून, सर्व्हेअर परिक्षा उत्तीर्ण किंवा तत्सम अर्हता धारण करणारी अनुभवी व्यक्ती.

४) **सहाय्यक (भूसंपादन)** :- शासकीय सेवेतील सेवानिवृत्त मंडळ अधिकारी/तलाठी किंवा कोणत्याही शाखेचा पदवीधर किंवा तत्सम अर्हता धारण करणारी अनुभवी व्यक्ती. मराठी टंकलेखन ३० शब्द प्र.मि. किंवा ४० शब्द प्र.मि.आवश्यक, संगणकीय कामाची माहिती असणे आवश्यक.

५) **मदतनीस** :- पदासाठी किमान शैक्षणीक अर्हता एच.एस.सी. उत्तीर्ण अथवा तत्सम दर्जाची परिक्षा उत्तीर्ण आवश्यक, उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे, मागासवर्गीयांसाठी ५ वर्षाने शिथिल असेल म्हणजेच ३८ वर्षे यापेक्षा जास्त नसेल.

६) **वाहनचालक** :- पदासाठी इयत्ता एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण. मोटार वाहन कायदा १९८५ नुसार CLMV/HMV वाहन चालविण्याचा पाच वर्षाचा अनुभव. वाहनचालविण्याचा परवाना उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे. मागासवर्गीयांसाठी ५ वर्षाने शिथिल असेल म्हणजेच ३८ वर्षे यापेक्षा जास्त नसेल.

## विशेष सूचना

१) उमेदवाराने सोबतच्या नमून्यांत अर्ज करावा व त्यावर स्वत:चा पासपोर्ट आकाराचा अलिकडच्या काळातील काढलेला फोटो चिटकवावा व सदर फोटोवर राजपत्रित अधिकारी याची स्वाक्षरी घेण्यात यावी.

२) एकाच व्यक्तीला वेगवेगळ्या पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास, प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा. ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव लिफाफ्यावर नमूद करावे.(उदा. वरिष्ठ सहाय्यक (कार्यालय) या पदाकरीता अर्ज.)

३) उपरोक्त पदांसाठीचे अर्ज दिनांक दिनांक ०४/०३/२०१५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग यांचे नावे जिल्हाधिकारी, रायगड यांचे कार्यालयातील नोंदणी शाखेत सिलबंद लखोटयात स्विकारले जातील. तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४) अर्जासोबत र.रु.२००/- (दोनशे मात्र) चे आवेदन शुल्क रेखांकित पोस्टल ऑर्डर, मा. अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी रायगड यांचे नावे जोडणे आवश्यक राहील.

५) अर्जासोबत जोडलेली अहर्तेबाबतची कागदपत्रे साक्षांकीत जोडावीत.

६) परीक्षेसाठी उमेदवारास स्वखर्चाने उपलब्ध रहावे लागेल. याकरिता प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

७) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी पेन्शन पेमेंट ऑर्डरची साक्षांकित प्रत जोडावी.

८) सदरच्या नियुक्ती या कंत्राटी स्वरुपाच्या असल्याने इतर कोणतेही शासकीय लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

९) उमेदवारांनी निवडीसाठी जिल्हा निवड समितीवर अप्रत्यक्ष/प्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यांना निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१०) सदर प्रकल्पामध्ये नियुक्त करण्यात येणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन हे संबधित सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचे सेवानिवृत्तीच्या वेळेस असणारे वेतन व सेवानिवृत्तीनंतर मिळणारी पेन्शन यामधील फरकाइतके राहील. त्यामध्ये स्थानिक खर्च, दूरध्वनीवरील खर्च, घरभाडे यासाठी लागणाऱ्या अतिरिक्त रकमेचा समावेश करण्यात येईल.या सर्व बाबींचा समावेश करुन संबधित अधिकारी व कर्मचारी यांना मिळणारे वेतन नमुद अधिकारी/कर्मचारी यांना वरीलप्रमाणे दर्शविलेल्या वित्तलब्धीच्या मर्यादेत (पेन्शन व्यतिरिक्त) राहील.

११) मुलाखतीवेळी मुळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

१२) उमेदवारांची मौखिक परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

१३) कंत्राटी पध्दतीने नियुक्ती केलेल्या उमेदवारांची सेवा भूसंपादन कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आपोआप संपुष्टात येईल.

१४) उमेदवार अपात्र झाल्यास स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

१५) निवड प्रक्रियेत निवड करण्याचे सर्व अधिकार जिल्हा निवड समितीस राहतील.

ठिकाण : अलिबाग

दिनांक : १२/०२/२०१५

सही /-XXX

(सुमंत भांगे)

अध्यक्ष,

जिल्हा निवड समिती तथा

जिल्हाधिकारी रायगड अलिबाग

# अर्जाचा नमूना

| अर्ज नोंदणी क्रमांक :- | |
|---|---|

येथे अर्जदाराने स्वत:चा फोटो चिकटवावा व त्यावर राजपत्रित अधिकाऱ्याची स्वाक्षरी घ्यावी.

प्रति,
मा.अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी रायगड,
ता. अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

**विषय :- ------------------------------ करीता अर्ज.**

**संदर्भ :-** आपलेकडील जाहिरात क्रमांक: मशा/आस्था-१/अ-८/प्र.क्र.०५ /कंत्राटीपदे/२०१४-१५ दिनांक १२/०२/२०१५

आपलेकडील संदर्भिय जाहीरातीप्रमाणे मुंबई-दिल्ली इंडस्ट्रियल कॉरीडोअर अंतर्गत अर्ली बोर्ड प्रोजेक्टसाठी ---------------------------------------- या पदाकरीता अर्ज करीत असून, जाहीरातीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | संपूर्ण नाव :- | |
| २) | पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता :- | |
| ३) | जन्मदिनांक :- दि.३१/०१/१५ रोजी होणारे पूर्ण वय (अंकात) | दिनांक ------------ महिना ------------ वर्ष ----------- <br> वर्ष---------------महिने-----------दिवस------------- |
| ४) | संपर्काचा क्रमांक :- | एसटीडी कोड ------------, दुरध्वनी क्रमांक------------- <br> मोबाईल क्रमांक --------------------------- <br> ई-मेल आय डी --------------------------- |
| ५) | जात प्रवर्ग :- | |
| ६) | लिंग :- | पुरुष/ स्त्री |
| ७) | राष्ट्रीयत्व :- | भारतीय/ अभारतीय |
| ८) | शैक्षणिक अहर्ता :- | |

**भाग - २**

| १) | इतर आवश्यक माहिती | नको असेल ते खोडावे | माहितीचा तपशील येथे नमूद करावा. |
|---|---|---|---|
| अ) | संगणक अहर्ता परिक्षा उत्तीर्ण | होय /नाही | प्रमाणपत्राचा क्रमांक - <br> दिनांक - |
| ब) | शाळा सोडल्याचा दाखला/ जन्म तारखेचा दाखला जोडला आहे का ? | होय /नाही | दाखला क्रमांक- <br> दिनांक - |
| क) | उमेदवार सेवानिवृत्त आहे काय ? <br> असल्यास ज्या पदावरुन सेवानिवृत्त झालात त्या पदाचे पदनाम व सेवानिवृत्तीचा दिनांक | होय /नाही | |

| | | | |
|---|---|---|---|
| ड) | सेवा निवृत्तीचा प्रकार- स्वेच्छासेवानिवृत्ती / नियत वयोमानानुसार | | |
| इ) | सेवानिवृत्तीवेळी असलेले वेतन ( पेन्शन पेमेंट ऑर्डरची साक्षांकित प्रत जोडावी.) | | |
| ई) | सर्व्हेअर परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र | होय /नाही | |
| फ) | मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.परिक्षा उत्तीर्ण किंवा इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि.परिक्षा उत्तीर्ण | होय /नाही | |
| ग) | मोटार वाहन कायदा १९८५ नुसार CLMV /HMV वाहन परवान्याची साक्षांकीत प्रत जोडावी. | होय /नाही | परवाना क्रमांक -<br>मुदत - |
| भ) | कामाचे अनुभव प्रमाणपत्र | होय /नाही | |
| म) | अर्जासोबत आवश्यक रकमेची पोस्टल ऑर्डर जोडली आहे का? | होय /नाही | रक्कम रुपये -<br>दिनांक - |

**उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञापत्र :-**

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खरी व सत्य आहे. त्या पृष्ठ्यर्थ मी , प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सादर करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो /करते की, वर दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास माझ्यावर कायदेशीर कारवाई होईल.तसेच या माहितीच्या आधारे होणारी शिफारस किंवा नियुक्ती रद्द होईल,याची मला पूर्ण जाणीव आहे.त्यासंबधी जिल्हा निवड समितीचा अथवा नियुक्ती प्राधिकरण यांचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील.त्याबद्दल मी नोकरी गमावण्यास बंधनकारक राहीन व त्यासंबधी माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

ठिकाण : -
दिनांक : -

आपला/ आपली विश्वासू

(अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी )

टिप :-

- वर नमूद केलेल्या लागू असणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात.
- नको असेल ते खोडा
- अर्जातील सर्व तपशील अचूक लिहीणे आवश्यक आहे.अर्ज अपुर्ण लिहील्यामुळे आपला अर्ज अपात्र ठरल्यास, त्याची जबाबदारी हे कार्यालय स्विकारणार नाही.
- आवश्यक कागदपत्रांव्यतिरीक्त अन्य कोणतेही कागदपत्र अर्जासोबत जोडू नयेत.